**<u>कुशल कामावरील (साधनसामुग्रीवरील)</u>**
**<u>खर्चाबाबत मार्गदर्शक सुचना</u>**

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन विभाग**
**मंत्रालय मुंबई ४०००३२**
**शासन परिपत्रक क्रमांक मग्रारोहयो २०१०/प्र.क्र २ / रोहयो-१० अ**
**दिनांक: १५ ऑक्टोबर, २०१०**

**वाचा:- १)महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम २००५ व त्याखालील मार्गदर्शक तत्वे**
**२) शासन निर्णय क्र.मग्रारोहयो २००६/प्र.क्र.१०६/रोहयो-१० दिनांक १९/१०/२००६**
**३) शासन निर्णय क्र.मग्रारोहयो २००८/प्र.क्र.३/रोहयो-१० दिनांक ५/६/२००८**
**४) शासन निर्णय क्र.मग्रारोहयो २००९/प्र.क्र.३२/रोहयो-१० दिनांक २०/७/२००९**

**<u>परिपत्रक</u>**

वरील संदर्भांकित शासन निर्णय कृपया पहावे. या शासन निर्णयांव्दारे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत कुशल कामे व त्यावरील खर्चाबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. तथापि ब-याच जिल्ह्यात महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेच्या कुशल भागाखालील कामाबाबत वेगवेगळया पध्दतीने कार्यवाही केली जाते. यासंदर्भात अनेक शंका उपस्थित केल्या जातात. सदर वस्तुस्थिती लक्षात घेता कुशल कामाच्या संदर्भात एकसुत्रता यावी व कोणतीही संदिग्धता राहू नये म्हणून खालील प्रमाणे स्पष्टिकरण व काही सूचना करण्यात येत आहेत.

केंद्र शासनाचा महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अधिनियम २००५ नुसार कुशल कामाबाबत (material componant) खालील सूचना देण्यात आल्या आहेत.

**<u>Mahatma Gandhi National Rural Employment Guarenty Act, 2005, Section 4(3)</u>**

**<u>SCHEDULE - I, Rule (9) :-</u>** The cost of material component of projects including the wages of the skilled and semi-skilled workers taken up under the Scheme shall not exceed forty per cent of the project cost

**<u>अधिनियम २००५ चे परिशिष्ट-एक, नियम-९</u>** :- या योजने अंतर्गत कामासाठी लागणारी साधन-सामुग्री, कुशल व अर्धकुशल मजुरी या वरील खर्च या प्रकल्पाच्या एकूण खर्चाच्या ४०% पेक्षा अधिक होऊ नये.

**<u>SCHEDULE - I, Rule (11) :-</u>** The Scheme shall not permit engaging any contractor for implementation of the project under it.

**<u>परिशिष्ट-एक, नियम-११ :-</u>** सदर योजनेत काम करुन घेण्यासाठी कोणत्याही कंत्राटदाराची नेमणूक करण्यास परवानगी नाही.

**SCHEDULE - I, Rule (12) :-** As far as practicable a task funded under the Scheme shall be performed by using manual labour and not machines

**परिशिष्ट-एक, नियम-१२ :-** या योजने अंतर्गत निधी उपलब्ध होण्यासाठी शक्यतोवर मजूरांद्वारे काम करणे आवश्यक असून यंत्राव्दारे काम करता येणार नाही.

**स्पष्टिकरणात्मक मुद्ये:-**

१. राज्य रोहयो अंतर्गत कुशल व अकुशल कामे अशी कामाची विभागणी करण्यात आली होती. मात्र केंद्र शासनाच्या योजनेची मार्गदर्शक तत्त्वे पाहता कुशल व अकुशल अशी कामाची विभागाची न करता खालीलप्रमाणे मजुरी व साधनसामुग्री (wages & material) अशी विभागणी करण्यात आली आहे

अ) मजुरी म्हणजे अकुशल कामावरील मजुरी,

ब) साधन सामुग्रीमध्ये कुशल कामाची मजुरी, अर्धकुशल कामाची मजूरी आणि इतर सर्व खर्च जसे प्रत्यक्ष कामासाठी वापरलेले साहित्य, वाहतूक खर्च, सुरूंगाचे साहित्य, प्रथमोपचार साहित्य इत्यादीचा समावेश असेल.

वरीलप्रमाणे केंद्र शासनाने खर्चाबाबत केलेली विभागणी लक्षात घेता भविष्यात मगांराग्रारोहयोच्या कामाच्या संदर्भात कुशल व अकुशल या शब्दाऐवजी मजुरी व साधनसामुग्री असा शब्दप्रयोग करणे संयुक्तिक ठरेल. तसेच या संज्ञाची राज्य रोजगार हमी योजनेशी सरमिसळ करू नये.

२. साधन सामुग्रीवरील खर्च ४० टक्क्यांपेक्षा जास्त असू नये. हे प्रमाण ४० टक्क्यांपेक्षा कमी करण्यास हरकत नाही. म्हणजेच कोणत्याही परिस्थितीत मजुरीवरील खर्च प्रकल्पाच्या एकूण खर्चाच्या ६० टक्क्यांपेक्षा कमी करू नये. मजुरीवर ६० टक्क्यांपेक्षा अधिक खर्च करण्यास कोणतेही बंधन नाही. ६०:४० हे प्रमाण ठरविण्यामागे साधनसामुग्रीवरील खर्चाचे प्रमाण कमाल ४० टक्क्यांच्या मर्यादेत राखणे शक्य व्हावे हा उद्देश असून, तंतोतंत ६०:४० प्रमाणात खर्च करण्याची आवश्यकता नाही.

३. मगांराग्रारोहयोचे वार्षिक लेखे एप्रील ते मार्च या आर्थीक वर्षात जिल्हानिहाय तयार केले जातात. त्यामुळे मजूरी व साधनसामुग्री चे प्रमाण प्रत्येक वर्षासाठी विहीत मर्यादेत ठेवणे आवश्यक आहे. जर एका आर्थीक वर्षात ( एप्रिल ते मार्च ) वार्षिक लेख्यांमध्ये साधनसामुग्रीवरील खर्चाचे प्रमाण कमाल ४० टक्क्यांपेक्षा जास्त झाल्यास लेखापरिक्षणात आक्षेप येवू शकतात. तसेच केंद्र शासनाकडून निधी प्राप्त होण्यात अडचणी निर्माण होऊ शकतात. म्हणून जिल्हा पातळीवर जिल्हाधिकारी व तहसिल पातळीवर तहसिलदार / गट विकास अधिकारी यांनी दर तीन महिन्यानी खर्चाचा आढावा घेऊन साधन सामुग्रीवरील खर्चाचे प्रमाण विहीत मर्यादेपेक्षा अधिक होणार नाही याची दक्षता घ्यावी. विशेषत: शेवटच्या तीमाहीत (जानेवारी ते मार्च ) याबाबत अधिक काळजीपुर्वक पहावे. याप्रमाणे आढावा घेऊन मगांराग्रारोहयो वर खर्च करताना खर्चाचे विहीत प्रमाण कायम ठेवण्याच्या दृष्टीने साधन सामुग्रीवरील खर्चात कपात किंवा वाढ करण्याबाबत निर्णय घ्यावा.

४. साधन सामुग्रीवरील खर्च कमाल ४० टक्क्यांच्या मर्यादेत ठेवण्याबाबत तहसिल / गट पातळीवर कार्यवाही होणे आवश्यक असून ही जबाबदारी तहसिलदार (कार्यक्रम अधिकारी) यांची

आहे. अपवादात्मक परिस्थितीत जिल्हाधिकारी (जिल्हा कार्यक्रम समन्वयक) साधन सामुग्रीवरील खर्च कमाल ४० टक्क्यांपेक्षा जास्त करण्यास परवानगी देऊ शकतात. मात्र एखाद्या तालुक्यातील खर्चाच्या प्रमाणातील बदलाची नोंद घेऊन जिल्हा पातळीवर ६०.४० प्रमाण संतुलीत करावे. ज्या तालुक्याला साधन सामुग्रीवरील खर्च ४० टक्क्यांपेक्षा जास्त करावयाचा आहे, त्यांनी त्याबाबत जिल्हाधिकारी यांची पुर्व परवानगी घ्यावी.

५. राजीव गांधी सेवा केंद्र, मगांराग्रारोहयो अंतर्गत घ्यावयाची राज्य रोहयोची अपूर्ण कामे इत्यादी कामे अशी आहेत की, जेथे साधन सामुग्रीवरील खर्च फार जास्त प्रमाणावर आहे, तेथे जिल्हाधिकारी यांनी योग्य नियोजन करून आर्थीक वर्षात मजुरी व साधन सामुग्रीवरील प्रमाण बिघडणार नाही याची दक्षता घ्यावी.

**<u>साधन सामुग्रीवरील खर्च करण्याबाबत सुचनाः-</u>**

१. कोणतेही काम DSR च्या मार्गदर्शक तत्वानुसार निश्चित केलेल्या दर्जापेक्षा कमी दर्जाचे नसावे. तसेच, कामाची गुणवत्ता तपासणी करताना किंवा तांत्रिक तपासणी करताना किंवा एखादया असमाधानकारक कामाची चौकशी प्रस्तावित करताना DSR मधील बाबींचे विवरण पायाभूत धरण्यात यावे.

२. ग्रामपंचायत किंवा यंत्रणांनी खरेदी केलेले साहित्य व वाहतुकीवरील खर्च याचे दर DSR मधील दरापेक्षा जास्त नसावे.

३. ग्रामपंचायत किंवा यंत्रणांनी केलेल्या खर्चाच्या सर्व पावत्या / व्हाऊचर सामाजिक अंकेक्षणाचा भाग म्हणून तपासणीसाठी ग्रामपंचायतीमध्ये उपलब्ध असणे आवशक आहे. ही जबाबदारी संबंधीत यंत्रणांची असेल.

४. जेव्हा ग्रामपंचायत कार्यान्वयन यंत्रणा असेल, तेव्हा साधनसामुग्रीवरील खर्च DSR च्या निकषाप्रमाणे असल्याबाबत पंचायत समिती व इतर कनिष्ठ अभियंत्याने / तत्सम तांत्रिक अधिकाऱ्याने प्रमाणीत करावे व तद्नंतर गट विकास अधिकारी यांनी देयक अदा करावे. मात्र प्रदाने एक आठवड्यात होतील व अनावश्यक विलंब होणार नाही याबाबत गट विकास अधिकारी यांनी दक्षता घ्यावी.

५. जेव्हा यंत्रणांमार्फत काम केले जाईल तेव्हा त्या यंत्रणांनी खर्च प्रमाणीत करावा व तहसिलदार यांनी त्याप्रमाणे प्रदाने करावीत. मात्र प्रदाने एक आठवड्यात होतील व अनावश्यक विलंब होणार नाही याबाबत तहसिलदार यांनी दक्षता घ्यावी.

६. साधनसामुग्रीवरील खर्चासाठी कोणताही अग्रिम निधी ग्रामपंचायत किंवा यंत्रणांना दिला जाणार नाही.

७. आकस्मिकता खर्चासाठी ठेवण्यात आलेला ६ टक्के निधी वेगळा असून या निधीची गणना मजुरीवरील खर्चामध्ये अथवा साधनसामुग्रीवरील खर्चामध्ये करू नये.

जर पुर्वी देण्यात आलेल्या मार्गदर्शक सुचना व या मार्गदर्शक सुचना यामधे काही विसंगती आढळल्यास या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे कार्यवाही करावी. तसेच सदर मार्गदर्शक सुचनांची

अंमलबजावणी करताना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अधिनियम २००५ व त्याखालील मार्गदर्शक सुचना तसेच या अधिनियमात वेळीवेळी होणाऱ्या सुधारणा यांचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**( म.वि.सावंत )**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रती,

मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-४०००३२
मा.मंत्री/राज्यमंत्री (रोहयो) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०००३२
प्रधान सचिव (कृषी), कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२
सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२
सर्व विभागीय आयुक्त,
आयुक्त (कृषी), महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व जिल्हाधिकारी, ( मुंबई व मुंबई उपनगर वगळून)
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,
संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, पुणे
संचालक, सामाजिक वनिकरण, पुणे.
मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, पुणे.
सर्व विभागीय कृषी सहसंचालक,
समिती अधिकारी, कार्यासन ड-७, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन,
सर्व उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, (मग्रारोहयो) नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
निवड नस्ती, कार्यासन रोहयो-१० अ, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२